


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे | अंक : २३० वा | गुरूवार | दि ०६ नोव्हेंबर २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# तेजस्वीच भविष्य! मतदानाला काही तास राहिले असताना भाजपला धक्का; बड्या नेत्याचा राजीनामा...

**वृत्तसंस्था/ पाटणा**

पाटणा: बिहार विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत, पहिल्या टप्प्यातील मतदानाला अवघे काही तास राहिलेले असताना भारतीय जनता पक्षाला मोठा धक्का बसला आहे. भागलपूर जिल्ह्यातील पीरपैंती विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार ललन कुमार यांनी भाजपची साथ सोडली आहे. ललन कुमार यांनी राष्ट्रीय जनता दलात प्रवेश केला आहे. त्यांनी पक्षाचं प्राथमिक सदस्यत्व घेतलं आहे. ललन कुमार यांनी बुधवारी राष्ट्रीय जनता पक्षात प्रवेश केला. तेजस्वी यादव यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्ष प्रवेश संपन्न झाला. यावेळी त्यांनी माजी मुख्यमंत्री राबडी देवी यांची भेट घेतली. ललन कुमार पीरपैंती मतदारसंघाचे विद्यमान आमदार असताना भाजप नं त्यांचं तिकीट कापलं. त्यांच्या जागी मुरारी पासवान यांना उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे नाराज झालेल्या ललन कुमार यांनी भाजपची साथ सोडली. भाजप नेतृत्त्वाकडे राजीनामा पाठवून ललन कुमार यांनी राजदमध्ये प्रवेश केला. ललन कुमार यांनी त्यांच्या राजीनाम्यात स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त केली. भाजप सोबतचा माझा राजकीय प्रवास आता संपत आहे. भाजपला आता दलित नेतृत्त्वाची गरज नसल्याचं वाटतं, असं ललन कुमार यांनी राजीनाम्यात नमूद केलं आहे.

ललन कुमार यांचा राजीनामा, त्यांनी राजदमध्ये प्रवेश केलेला प्रवेश भाजपसाठी धक्का मानला जात आहे. बिहारमध्ये दोन टप्प्यात मतदान होत आहे. पहिल्या टप्प्यातलं मतदान उद्या आहे. मतदान सुरु व्हायला अवघे काही तास राहिलेले असताना ललन कुमार यांनी भाजपला रामराम केला आहे. राजदमध्ये प्रवेश केल्यानंतर ललन कुमार यांनी तेजस्वी यादव आणि राबडी देवी यांच्यासोबतचा फोटो सोशल मीडियावर शेअर केला. राष्ट्रीय जनता दल दिवसागणिक मोठा होत आहे. त्या परिवारात आज मीदेखील सामील झालो. बिहार तेजस्वीमय करायचा आहे. आम्ही सगळ्यांनी मिळून हा निश्चय केला आहे. तेजस्वीच वर्तमान आणि तेजस्वीच वर्तमान आहे. जय भीम, असं ललन कुमार यांनी पोस्टमध्ये नमूद केलं आहे. ललन कुमार यांनी पिरपैंती विधानसभा मतदारसंघात २०20



मध्ये राष्ट्रीय जनता दलाच्या राम विलाश पासवान यांचा तब्बल २७ हजार मतांनी पराभव केला होता. त्याआधी २०१५ मध्ये त्यांना निसटता पराजय पत्करावा लागला होता. त्यावेळी राजदचे राम विलाश पासवान निवडून आले. तेव्हा ललन कुमार यांचा केवळ ५ हजार ११४ मतांनी पराभव झाला होता. ललन कुमार यांनी ७४ हजार ९१४ मतं घेतली होती. २०20 मध्ये ललन कुमार यांनी ९६ हजार २२९ मतं मिळवली.

# विरोधकांना महाझटका! औरंगाबाद एकहाती जिंकून देणारा नेता भाजपच्या गळाला; समीकरणं फिरणार?



**वृत्तसंस्था/ औरंगाबाद**

बिहारमध्ये विधानसभेचा धुरळा उडाला आहे. राज्यात एनडीए विरुद्ध महागठबंधन यांच्यात थेट संघर्ष आहे. उद्या पहिल्या टप्प्याचं मतदान होणार आहे. मतदान अवघ्या काही तासांवर आलेलं असताना महागठबंधनला मोठा धक्का बसला आहे. २०२० च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय जनता दलाचे जिल्हाध्यक्ष असताना आपल्या रणनीतीनं एनडीएचा चक्रव्यूह भेदणाऱ्या नेत्यानं हाती कमळ घेतलं आहे. माजी आमदार आणि कुशवाहा समाजाचे नेते सुरेश मेहता यांनी त्यांच्या समर्थकांसह राष्ट्रीय जनता दलाला सोडचिठ्ठी दिली आहे. सुरेश मेहता यांनी बुधवारी औरंगाबाद विधानसभा मतदारसंघाचे एनडीएचे उमेदवार त्रिविक्रम नारायण सिंह यांचे वडील आणि राज्यसभेचे माजी सदस्य गोपाल नारायण सिंह यांच्यासोबत त्यांनी पत्रकार परिषद घेतली. उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांचे वडील शकुनी चौधरी मला पालकांसारखे आहेत, असं सुरेश मेहता म्हणाले.

शकुनी चौधरी यांनीच मला लालू प्रसाद यादव यांच्या पक्षात आणलं होतं. त्यांनीच मला २000 साली तिकीट मिळवून दिलं आणि आमदार केलं. यानंतर राजदनं मला दोनदा उमेदवारी दिली. पण माझा पराभव झाला. पण त्यानंतरही मी पक्ष मजबूत करण्याचं काम प्रामाणिकपणे केलं. २0२0 मध्ये राजदचा जिल्हाध्यक्ष असताना माझ्या रणनीतीच्या जोरावर निवडणुकीतील चक्रव्यूह भेदलं आणि औरंगाबादमधील सर्वच्या सर्व सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये महागठबंधनला विजय मिळवून दिला, याची आठवण मेहता यांनी काढली. राजदचा जिल्हाध्यक्ष नसतानाही महागठबंधनचं सामर्थ वाढवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यामुळे औरंगाबाद आणि काराकाट या दोन्ही लोकसभा मतदारसंघांमध्ये महागठबंधनला यश मिळालं. औरंगाबाद जिल्ह्यात एनडीएचा सुपडासाफ झाला. पण त्यानंतरही पक्षानं माझी उपेक्षा केली. त्यामुळे मी उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्याशी संपर्क साधला. आता त्यांनी माझ्याकडे औरंगाबाद विधानसभा निवडणूक लढत असलेल्या त्रिविक्रम नारायण सिंह यांना विजयी करण्याची कामगिरी सोपवली आहे. भाजपनं दिलेली जबाबदारी मी प्रामाणिकपणे पार पाडेन, असं मेहता यांनी सांगितलं. माजी आमदार सुरेश मेहता यांचा औरंगाबाद विधानसभा क्षेत्रातील कुशवाहांच्या मागास-अतिमागास जातींवर प्रभाव आहे. औरंगाबाद खासदार अभय कुशवाहा राजदचे आहेत. त्यांना शह देत कुशवाहा मतं फिरवण्यासाठी भाजपनं मेहता यांना पक्षात घेतलं आहे.

# मनाचे दिवस, मानाचे दिवस!

## संपादकीय लेख

प्राथमिक आरोग्यकेंद्रे आणि जिल्हा रुग्णालयातील मनोविकारकक्षात गेल्या तीन वर्षांत तब्बल बत्तीस लाखांवर रुग्णांनी मदत घेतलीफ, ही विक्रमी संख्या असल्याचे वृत्त वाचनात आले आणि मन चाळीस वर्षे मागे गेले! रुग्णांनी मदत घेतलीफ, ही विक्रमी संख्या असल्याचे वृत्त वाचनात आले आणि मन चाळीस वर्षे मागे गेले! एक जुना प्रसंग, साल १९९०. मी मानसतज्ज्ञाचा व्यवसाय सुरु करून पाच-सहा वर्षे झाली असतील. एक खेडवळ दिसणारा माणूस आपल्या शाळकरी पोराला घेऊन आला. ङ्गडॉक्टर, याचं अभ्यासात लक्ष लागत नाहीय. आठवीत आहे, मागल्या वर्षापर्यंत छान अभ्यास करायचा. वर्गात पहिला नंबर असायचा. आजकाल सगळं लक्ष खेळण्यात. ऐकत नाही, उलटी उत्तरे देतो. इंग्रजी कठीण जाते त्याला. बघा जरा डोस्कं तपासून काही फॉल्ट हाय का,फ बापाने कैफियत मांडली, आणि मी आश्चर्यमिश्रित कौतुकाने पाहत राहिलो. जिथे मनाचे आजार असतात, त्यासाठी मनोविकारतज्ज्ञ असतात या माहितीची वानवा, तेथे ग्रामीण भागातील एक बाप मुलाचे शिक्षणात लक्ष लागावे यासाठी मनोविकारतज्ज्ञाची (त्याच्या भाषेत ङ्गडोस्क्याच्या डॉक्टरची) मदत घेऊ इच्छितो, ही माझ्या मनाला उभारी देणारी गोष्ट. मात्र ऐंशीच्या दशकापर्यंत मानसिक आजारांबद्दल सर्वसामान्य लोकांसह वैद्यकीय क्षेत्रात देखील फारशी माहिती नव्हती. औषधे सीमित उपयोगाची होती. त्यांचे दुष्परिणाम त्रासदायक होते. शॉक ट्रिटमेंट हे उपचाराचे प्रमुख आयुध होते, त्याची उपयुक्तता असूनही गैरसमज अधिक होते. एमबीबीएसच्या वैद्यकीय अभ्यासक्रमात मनोविकारशास्त्राला कवडीचे महत्त्व नव्हते. तसे ते आजही नाही. त्यामुळे सर्वसाधारण डॉक्टरांना मनोविकारांची ओळख ही सामान्य माणसाइतकीच वरवर, हे वास्तव. जागतिक आरोग्य संघटनेने १९७३ पासून मानसिक आरोग्याची दखल घेणे सुरू केले. त्याआधी वेड्यांची इस्पितळे आणि त्यातील मनोरुग्णांची स्थिती याविषयी तुरळक चर्चा होत असे. ही प्रादेशिक मनोरुग्णालये म्हणजे ठार वेड्यांचे गोदाम, अशी सर्वसामान्य लोकांची कल्पना, त्यांची आधारापेक्षा दहशत अधिक. जिल्हा रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालये हे गरिबांचे आशास्थान, मात्र महाराष्ट्रात पुणे आणि मुंबई वगळता इतर ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालयात मनोरुग्णांसाठी बाह्यरुग्णविभाग नव्हते, विद्यार्थ्यांसाठी पदव्युत्तर अभ्यासक्रम नव्हते. मुंबईत या अभ्यासक्रमाच्या जागा रिकाम्या जात, सहसा विद्यार्थी मनोविकारतज्ज्ञ होण्यास तयार नव्हते! मनोविकारांविषयी हे अज्ञान आणि उदासीनता वैद्यकीय महाविद्यालयातील शिक्षकांमध्येही असावी? २०१५ सालची गोष्ट. मनोविकारशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या एका होतकरू विद्यार्थ्याला महाविद्यालयाच्या अधिष्ठाता बाई म्हणाल्या, अरे, तुझ्यासारख्या धडधाकट विद्यार्थ्याने शल्यक्रिया, अस्थिव्यंगशास्त्रात शिक्षण घ्यायचे, हे वेड्यांचा डॉक्टर होण्याचे खूळ तुझ्या डोक्यात कसे आले?फही मनोविकारांविषयी खास भारतीय मानसिकता, मग ती व्यक्ती उच्चविद्याविभूषित का असेना. शैक्षणिक संस्था समाजाच्या मुलभूत गरजांपासून तुटलेली, हे वास्तव. मात्र जागतिक आरोग्य संघटनेने हे वास्तव ओळखले आणि १९९० साली मानसिक आजार आणि व्यसनाधीनता याबद्दल सर्व देशांना मानसिक आरोग्यवाढीचे धोरण आखण्यास भाग पाडले. भारतात शासनाच्या धोरणात वैद्यकीय सेवांत मनोविकारांचा अंतर्भाव झाला १९८२ साली. मात्र त्याला वेग आला १९९६ साली, जेव्हा प्रत्येक जिल्हा रुग्णालयात मनोविकारतज्ज्ञाचे स्वतंत्र पद निर्माण करण्यात आले. बाह्यरुग्णविभाग सुरू करण्यात आला. याला कारण मनोविकारांचे भीषण वास्तव. जगात सुमारे एक बिलियन म्हणजे १०० कोटी लोक तीव्र मनोविकाराने ग्रस्त आहेत, असे जागतिक आरोग्य संघटनेची आकडेवारी सांगते. त्यातले १४ कोटी रुग्ण तर भारतातले. दरवर्षी सुमारे ८ लाख लोक आत्महत्या करतात, त्यातल्या किमान दीड लाख एकट्या भारतात घडून येतात. त्यातही विद्यार्थी आणि तरुण स्त्रियांची संख्या अधिक. या आकडेवारीच्या पार्श्वभूमीवर सगळ्यात भयंकर गोष्ट म्हणजे देशात असलेली मनोविकारतज्ज्ञांची तुटपुंजी संख्या. एक लाख लोकसंख्येमागे किमान पाच मनोविकारतज्ज्ञ असावेत, हे जागतिक आरोग्य संघटनेचे मानक, तसे युरोपमध्ये लाखामागे सहा तज्ज्ञ आहेत. भारताची स्थिती काय? देशातल्या एकूण मनोविकारतज्ज्ञांची संख्या आहे फक्त नऊ हजार. दर लाख लोकसंख्येसाठी केवळ ०.७५ मनोविकारतज्ज्ञ! समुपदेशक, विशेष प्रशिक्षित परिचारिका तर नसल्यात जमा. दरवर्षी महाविद्यालयातून पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या तज्ज्ञांची संख्या इतकी कमी, की जागतिक मानक साध्य करण्यासाठी किमान ७५ वर्षे लागतील! या सगळ्या परिस्थितीत मनोरुग्णांची व्याप्ती काय सांगते? जागतिकीकरण, आर्थिक सुस्थिती आणि शहरीकरण हे तीन घटक भारतीय तंत्रज्ञांच्या प्रगतीचे मानकरी, तेच मनोविकारांची एक प्रचंड लाट आणण्यास कारणीभूत ठरलेले घटक. १९९०च्या दशकापासून भारतीय समाज एका अभूतपूर्व स्थित्यंतरातून जायला सुरवात झाली. ग्रामीण भागातील ३० टक्के लोक शहरात स्थलांतर करून राहू लागले. रोजगाराच्या संधी, आधुनिक राहणीचे आकर्षण, शेतीचे बिघडते अर्थशास्त्र अशी अनेक कारणे. याचा थेट परिणाम कुटुंबव्यवस्थेवर होणे अपरिहार्य होते. पूर्वी कधीतरी असलेली विस्तारित कुटुंबे केव्हाच लयाला गेलेली, त्यानंतर आली एकत्रित कुटुंबे. तोवर सारं ठीकच होतं. मात्र जागतिकीकरणाने एकत्रित कुटुंबे आक्रसली, नव्या नोकरी-व्यवसायाच्या रुंदावलेल्या क्षितिजावर स्वार होऊन नवीन पिढी सातासमुद्रापलीकडे जाऊन पोचली. आता कुटुंबे केंद्रीय (न्युक्लिअर) झाली. २०20 नंतर लग्नसंस्था एका संक्रमणाच्या लाटेत सापडली. नवी पिढी नवे प्रयोग करती झाली. मग एकल पालक कुटुंबे आली. या सगळ्याचा मानसिक विकारांशी काय संबंध? तर कुटुंबातील मानसिक समस्याग्रस्त सदस्याला पूरक, आश्वासक, आधारभूत असणारी कौटुंबिक नाती दुरावली. एकेकाळी अपयश, आपत्ती, आजारपण आणि नैराश्य ओढवलेल्या पोराला आई-वडिलांच्या व्यतिरिक्त आजी-आजोबा, काका-मामा, चुलत भाऊ-बहिणी यांचे पाठबळ असायचे. अननुभवी सुनेचे सुख-दुःख वाटून घेणाऱ्या सासुरवाशिणी वाटेकरी असायच्या. व्यसनाधीनतेच्या वाटेवर निघालेल्या पुरुषाला अटकाव करणारे ज्येष्ठ आप्त होते, त्यांच्या शब्दाला मान होता. मानसिक समस्या कमी होत्या, कारण जीवनाकडून अपेक्षा कमी होत्या. स्पर्धा जीवघेणी झाली नव्हती, महत्त्वाकांक्षा राक्षसी झाल्या नव्हत्या!




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# हे सरकार चोर; त्यांच्याविरुद्ध हर हर महादेव आरोळी ठोका', ठाकरे धाराशिवमध्ये कडाडले

**धाराशिव :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आज धाराशिवच्या भूम तालुक्याच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्य सरकारवर सडकून टीका केली. 'सगळे शेतकरी आहेत ना रे? नाही म्हणजे आता काय झालंय, चोर ते चोर, वरुन चोराच्या उलट्या बोंबा, असं सरकारचं काम आहे. हे हेही बोलायला कमी पडणार नाहीत की, उद्धव ठाकरेंनी मुंबईतून माणसं आणली आणि त्यांना धोतर-टोपी घालून बसवलं. हे सरकार चोर आहे', असा घणाघात उद्धव ठाकरे यांनी केला.

अनिल दादा बोलत होता. म्हणजे काय बोलायचं? हा हंबरडा फोडून नाही चालायचं. त्यांच्या विरुद्ध हर हर महादेव म्हणून मोठी आरोळी ठोकली पाहिजे. हर हर महादवे अनब या मैदानामध्ये. किती फसवणूक करायची?', असा सवाल ठाकरेंनी केला.मधल्या काळामध्ये आपत्तीमध्ये मी आलो होतो. त्यानंतर मी एक मोर्चाही काढला. आपले मुख्यमंत्री काय म्हणाले, इतिहासातील सर्वात मोठं पॅकेज. तेव्हाच मी बोललो होतो की, ही इतिहासातील सर्वात मोठी थाप आहे. आता मी तेच विचारायला आलो आहे. नेमकं काय-काय पडलं आहे? पॅकेज जाहीर झाले आहेत, ज्यांची जमीन खरडून गेली आहे त्यांना किती रुपये मिळाली आहेत. एवढं बेमालूमपणाने बोलायचं. पॅकेज जाहीर केलं.



पण शेतकऱ्याच्या बँक खात्यात पैसे का आले नाहीत? त्या पॅकेजला सुद्धा खेकड्याने भोकं पाडले का? जसं धरणाला खेकड्याने पाडलं होतं', असा टोला उद्धव ठाकरेंनी लगावला.'या अन्नदात्याला तुम्ही किडलेलं धान्य देत आहात, या सरकारला लाज वाटत नाही, या बेशरम राज्यकर्त्यांना लाज वाटत नाही. तांदूळ बघितले. आपल्या मुलाबाळांना आपण हे खायला देणार? तुम्ही सोनं पिकवायचं आणि खायला माती द्यायची. हा कुठला न्याय आहे? सरकार दगाबाज आहे. दगाबाजासोबत दगाबाजीच केली पाहिजे. दगाबाजी केल्याशिवाय चालणार नाही. मी आज बोलायला आलेलो नाही तर तुम्हाला बोलतं करायला आलेलो आहे', असं उद्धव ठाकरे म्हणाले.निवडणुका आल्या म्हणून तुम्ही आपत्ती मदतीला स्थगिती देताय. मग आता सुद्धा ढगाळ वातावरण आहे. निवडणुका आल्या म्हणून तुम्ही पावसाला स्थगिती देताय? आचारसंहिता लागल्या हे पावसा पडू नको असं म्हणतो का? नाही ना? शेतकऱ्याचं सगळं उद्धवस्त झालं आहे. पीक विम्याचे पैसे किती जणांना मिळाले आहेत. काही लोकांना मिळाली आहेत. किती मिळाले आहेत? दोन रुपये, सहा रुपये मिळाले आहेत. पीक विम्यासाठी किती रुपये भरावे लागतात? एकरी १२०० रुपये. पिकानुसार वेगळा दर. नुकसान झाल्यानंतर तुम्हाला तीन रुपये मिळतात?', असे देखील सवाल त्यांनी केले. विमा कंपन्यांना सांगतोय, शेतकऱ्यांची पूर्ण भरपाई द्या. नाहीतर हे सर्व शेतकरी तुमच्या कार्यालयात धडकल्याशिवाय राहणार नाहीत. आनंदाचा शिधा बंद. शिवभोजन थाळी बंद. मुख्यमंत्री बोलले होते, दिवाळी आधी मदत करणार. पण आता मुख्यमंत्री कुठे? तर बिहारमध्ये. मुख्यमंत्री तिथल्या जाहीर सभेत सांगतात की, पंतप्रधानांचं सगळ्या राज्यांवरती प्रेम आहे. पण आतली गोष्ट म्हणजे पंतप्रधान मोदींचं बिहारवर जास्त प्रेम आहे', असं उद्धव ठाकरे म्हणाले.

## राजकीय भूकंपाचं जळगाव केंद्र ठरणार?

**जळगाव :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचं बिगूल वाजलं असलं तरी सत्ताधारी महायुती पक्षांमध्ये सारं काही आलबेल आहे, असं म्हणता येणार नाही. कारण अनेक ठिकाणी सत्ताधारी पक्षांम धला मतभेद उफाळून येताना दिसतोय. जळगावमध्ये सत्ताधारी शिवसेना आणि भाजपात सारं काही आलबेल आहे, असं म्हणता येणार नाही. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे भडगाव-पाचोरा मतदारसंघाचे आमदार किशोर पाटील यांनी शिवसेनेच्या मेळाव्यात जाहीरपणे भाजपवर निशाणा साधला होता. त्यांच्या टीकेला आता चाळीसगावचे भाजप आमदार मंगेश चव्हाण यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. त्यामुळे हा वाद जास्त टोकाला गेला तर महाराष्ट्राच्या राजकारणात कदाचित वेगळ्या गोष्टी घडू शकतात आणि त्याचं केंद्र कदाचित जळगाव असू शकतं का? असा प्रश्न उपस्थित होतोय. नगरपरिषदांच्या निवडणुकीचा बिगुल वाढल्यानंतर आता राजकीय नेत्यांचे देखील फटाके वाजायला सुरुवात झाली आहे. पाचोरा येथे आज भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्त्यांचा मेळावा घेण्यात



आला. या मेळाव्याला प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार मंगेश चव्हाण होते. त्यांनी पाचोरा येथे आमदार किशोर पाटील यांच्यावर टीका करताना सांगितले की, चाळीसगावमध्ये शिवसेना शिंदे गटाचा एक नगरसेवक निवडून आणून दाखवावे. मी त्यांचा जाहीर सत्कार करेन. त्यांनी पार्चोयामध्ये येऊन किशोर पाटील यांना आव्हान दिलं आहे.शिवसेना शिंदे गटाचा निर्धार मेळावा नुकताच मंत्री गुलाबराव पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पाचोरा येथे पार पडला होता. यावेळी आमदार किशोर पाटील यांनी भाजपवर जोरदार टीका केली होती. तसेच आताचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक कवडी देखील निधी आम्हाला दिला नसल्याची खंत भर सभेत त्यांनी बोलवून दाखवली होती.

## भाजपकडून ५ आम दारांभोवती फिल्डींग

**नाशिक :** राज्यात महायुतीचं सरकार असलं तरी भारतीय जनता पक्षानं २०२९ मध्ये स्वबळावर लढण्याची तयारी आतापासूनच सुरु केली आहे. त्याची झलक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पाहायला मिळणार आहे. अनेक ठिकाणी भाजप स्वबळावर लढायच्या तयारीत आहे. याचा सर्वाधिक फटका सत्तेत असलेल्या भाजपच्या मित्रपक्षांना बसणार आहे.२०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीत भाजपला राज्यात मोठा फटका बसला. पण विधानसभा निवडणुकीत भाजपनं मुसंडी मारत १३२ जागा जिंकल्या. यानंतर आता भाजपनं २०२९ मध्ये स्वबळावर लढण्याची तयारी केली आहे. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार असलेल्या मतदारसंघांमध्ये भाजपनं त्यांना पर्याय उभे केले आहेत. अजित पवारांचे आमदार असलेल्या सिन्नरमध्ये भाजपनं उदय सांगळे यांच्या हाती कमळ दिलं आहे. तर दिंडोरीत रामदास चारोस्कर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

## राज ठाकरे सोबत नको? काँग्रेसच्या गोटात हालचाली, पडद्यामागे काय सुरु?

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात पडद्याम गे घडामोडींना वेग आला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे एकीकडे राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाच्या विरोधात रोखठोक भूमिका मांडताना दिसत आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे एकत्र येताना दिसत आहेत. पण ते आगामी मुंबई महापालिका निवडणुकांम ध्ये एकत्र येणार का? हे गुलदस्त्यात आहे. असं असलं तरी दोन्ही पक्ष एकत्र निवडणूक लढवणार असल्याची चर्चा आहे. पण मग दोन्ही ठाकरे एकत्र येणं हे काँग्रेसला मान्य असणार का? असा देखील प्रश्न उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे काँग्रेसचे महाराष्ट्रातील काही नेते राज ठाकरेंना सोबत घेण्यासोबत अनुकूल नसल्याची चर्चा आहे. महाराष्ट्र काँग्रेसची हायकमांडसोबत चर्चा होणार आहे. यावेळी महाराष्ट्रातील काँग्रेस नेते हायकम ांडला काय सांगतात आणि हायकमांड काय निर्णय जाहीर करणार? याकडे



सर्वांचं लक्ष लागलं आहे.


आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेस स्वतंत्र निवडणूक लढवण्यावर ठाम असल्याची माहिती टीव्ही ९ ने सूत्रांच्या हवाल्याने दिली आहे. मनसेसोबत युती नको, अशी काँग्रेसची भूमिका आहे. इंडिया आघाडीच्या घटक पक्षांसोबत युती हवी, पण मनसेसोबत युती नको, अशी काँग्रेसची भूमिका आहे. महाराष्ट्र काँग्रेसचा हा स्थानिक पातळीवर निर्णय झाल्याची माहिती आहे. तसेच स्थानिक पातळीवरचा हा निर्णय महाराष्ट्र काँग्रेस हायकमांडला कळवणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

# किल्ल्यांवरचं नमो सेंटर फोडणार' म्हणणाऱ्या राज ठाकरेंवर श्रीकांत शिंदेंचा पलटवार, राज यांच्यावर टीकेचे बाण!

**बुलढाणा :** आगामी निवडणुका लक्षात घेता, आता राज- उद्धव हे ठाकरे बंधू एकत्र लढतील अशी स्थिती नक्की मानली जात आहे. त्यामुळे आता ठाकरे बंधूंनी आपले राजकीय विरोधक पक्के करण्यास सुरुवात केली आहे, असे म्हणावे लागेल. मागच्या काही सभा आणि त्यामधली या दोन्ही भावांची भाषणं पाहिली तर त्यांनी भाजप आणि शिंदे गटावर तुटून पडायची भूमिका घेतल्याचे पाहायला मिळते आहे. त्यामुळे मुंबई, ठाणे महापालिका निवडणुकीत चांगलीच चुरस पाहायला मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पंचाहत्तरीनिमित्त छत्रपती शिवाजी म हाराजांच्या किल्ल्यांवर नमो टुरिझम सेंटर्स उभे करणार असल्याची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषणा केलेली आहे. त्यावरून मनसेप्रमुख राज ठाकरेंनी एकनाथ शिंदेंना चांगलंच घेरलं आहे. त्यांनी नमो टुरिझम उभे केले की फोडून टाकणार असा थेट इशारा दिला आहे.

दरम्यान, यावरुन आता पहिल्यांदाच शिंदे सुपुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांनी राज ठाकरेंवर पलटवार केला आहे. हे लोक काहीही निर्माण करू शकत नाहीत त्यामुळे तोडफोडीची भाषा करतात अशी जोरदार टीका श्रीकांत शिंदे यांनी राज



ठाकरेंवर केली आहे. विशेष म्हणजे राज यांच्यावर श्रीकांत शिंदे यांनी यावेळी पहिल्यांदाच अशी थेट टीका केली आहे.राज्य सरकारच्या पर्यटन विभागाने किल्ल्यांवर नमो केंद्रांची उभारणी केली तरी ती मोदींच्या नावाने उभी करण्याला राज ठाकरेंनी विरोध केला आहे. त्यांनी हे केंद्र फोडून टाकण्याचा आदेश म नसैनिकांना दिला आहे. त्यावरुनच आता एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव श्रीकांत शिंदे यांनी राज यांच्यावर टीका केली आहे. ते आज बुलढाण्यात पत्रकारांशी बोलत होते.ही टीका करताना श्रीकांत शिंदे म्हणाले ' राज ठाकरे नमो पर्यटन केंद्र फोडण्याचा इशारा देतात कारण, त्यांच्याकडून काहीही चांगलं झालेलं नाही. ही लोकं काही निर्माण करु शकत नसल्याने तोडाफोडीची भाषा करतात. एवढी आगापाखड करण्याची गरज काय?' असं म्हणत श्रीकांत शिंदे यांनी राज ठाकरेंना टार्गेट केलं आहे.

ते पुढे म्हणाले की, 'गडकिल्ल्यांवर पर्यटकांना माहिती मिळण्यासाठी ते केंद्र सुरु करण्यात येणार आहेत. किल्ल्यांच्या किंवा मंदिरांच्या जीर्णोद्धारांच काम म हायुती सरकारनेचं केलं. त्यामुळे नरेंद्र म ोदींचं कौतुक करण्याऐवजी ते फोडण्याची भाषा करतात. मात्र कधी काळी यांनीही नरेंद्र मोदींचे कौतुक केले होते', असाही टोला श्रीकांत शिंदेंनी राज ठाकरेंना लगावला आहे.

# फेक पोलिसाचा खेळ खल्लास! मुंबईतील सज्जाद इराणी गजाआड, कारनामे ऐकून पोलिस थक्क

**मुंबई :** 'मी पोलीस आहे, तपासासाठी आलो आहे,' असं सांगून नागरिकांचा विश्वास संपादन करून त्यांना लुटणाऱ्या कुख्यात फसवणूकबाज सज्जाद इराणीचा खेळ अखेर संपला आहे. नवी मुंबई गुन्हे शाखेने या सराईत गुन्हेगाराला गजाआड करत मकोका अंतर्गत कारवाई केली आहे. सज्जाद गरीबशहा इराणी असं या आरोपीचं पूर्ण नाव असून, तो राज्यातील विविध ठिकाणी बनावट पोलीस बनून नागरिकांना लुटत असे. पोलिसांच्या तपासात उघड झालं की, या अट्टल गुन्हेगारावर १०० पेक्षा अधिक गुन्ह्यांची नोंद आहे. एवढेच नव्हे, तर नवी मुंबई परिसरातच त्याने १५ फसवणुकीचे गुन्हे केल्याची कबुली त्याने दिली आहे. सज्जाद इराणी फसवणुकीसाठी पोलीस गणवेश, बनावट ओळखपत्रे, अधिकृत शिक्के आणि कागदपत्रांचा वापर करत असे. तपासाच्या नावाखाली तो लोकांकडून पैसे, दागिने आणि मौल्यवान वस्तू उकळून घेत असे. काही वेळा तो वाहनचालकांना अडवून पोलीस कारवाईचा दिखावा करत, पैशांची उकळपट्टी करत असे.या सराईत गुन्हेगाराचा माग काढण्यासाठी नवी मुंबई गुन्हे शाखेने २५ दिवसांहून अधिक काळ सीसीटीव्ही फुटेज तपासले. शेवटी गोपनीय माहितीदाराच्या मदतीने पोलिसांनी पुण्यातील ठिकाणी छापा टाकून आरोपीला अटक केली. कारवाईदरम्यान पोलिसांनी त्याची पत्नी फिजा सज्जाद इराणी हिला चौकशीसाठी ताब्यात घेतलं आणि तेथे मोठा मुद्देमाल हस्तगत केला. पोलिसांनी सुमारे ११८६ ग्रॅम सोन्याचे दागिने, बनावट पोलीस आयडी कार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड, तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त केली. या सर्व मुद्देमालाची किंमत तब्बल १ कोटी २५ लाख १० हजार रुपये इतकी आहे.नवी मुंबई पोलिसांनी सांगितलं की, सज्जाद इराणीच्या अटकेमुळे फसवणुकीच्या अनेक प्रकरणांचा गुंता सुटण्याची शक्यता आहे. पोलिसांनी नागरिकांना इशारा दिला आहे की, 'कोणतीही व्यक्ती स्वतःला पोलीस असल्याचं सांगत असल्यास तिची खातरजमा करा. खरा पोलीस कधीही तुमच्याकडून पैसे मागणार नाही', या अटकेमुळे नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.



## लोकलमध्ये प्रवाशांना दिला त्रास, स्टेशन येताच टवाळखोरांचं वातावरण टाईट

**रायगड :** गर्दीच्या वेळी वाशीहून पनवेलकडे जाणाऱ्या लोकलमध्ये काही टवाळ तरुणांनी महिला प्रवाशांसमोर अश्लील शिवीगाळ आणि टवाळगिरी केली. या प्रकारामुळे प्रवाशांमध्ये तणाव निर्माण झाला होता. मात्र, महाराष्ट्र पोलिस बॉईज संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष किशोर वाजे यांनी तातडीने रेल्वे पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत या तरुणांना पनवेल स्थानकात ताब्यात घेतले. या घटनेमुळे प्रवाशांनी सुटकेचा निश्वास सोडला असून, किशोर वाजे यांच्या धाडसाचे कौतुक होत आहे.

गर्दीच्या वेळी लोकलमध्ये प्रवास करणे अनेकांसाठी त्रासदायक ठरते. अशाच एका गर्दीच्या लोकलमध्ये वाशीहून पनवेलकडे जाताना काही तरुणांनी गैरवर्तन सुरू केले. त्यांनी प्रवाशांमध्ये गोंधळ घातला आणि महिला प्रवाशांसमोर अश्लील शिवीगाळ केली. यामुळे डब्यातील वातावरण तणावपूर्ण बनले. इतर प्रवाशांनी त्यांना शांत राहण्याची विनंती केली, पण हे तरुण उलट प्रवाशांशीच धक्काबुक्की करू लागले.कठीण परिस्थितीत, महाराष्ट्र पोलिस बॉईज संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष किशोर वाजे यांनी प्रसंगावधान दाखवले. त्यांनी लगेच पनवेल रेल्वे पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विजय तायडे यांना या घटनेची माहिती दिली. वरिष्ठ निरीक्षकांच्या सूचनेनुसार, पोलीस कर्मचारी इंगवले, वाघे आणि महिला पोलीस सुळे यांचे पथक तातडीने पनवेल स्थानकावर पोहोचले.

जेव्हा लोकल पनवेल स्थानकात पोहोचली, तेव्हा पोलिसांनी त्या टवाळ तरुणांना लगेच ताब्यात घेतले. पुढील चौकशीसाठी त्यांना रेल्वे पोलिस ठाण्यात नेण्यात आले. या कारवाईमुळे लोकल प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला. किशोर वाजे यांनी दाखवलेल्या सामाजिक सजगतेचे आणि धाडसाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. प्रवाशांनीही या कारवाईबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

## ९ वर्षीय चिमुकलीवर लैंगिक अत्याचार

**लातूर :** लातूरमध्ये शिरूर अनंतपाळ तालुक्यातील एका गावातील एक ९ वर्षे वयाची बालिका गावातीलच एका मेडिकल दुकानात औषधाची गोळी आणण्यासाठी गेली असता एका इसमाने दुकानाच्या वरच्या मजल्यावर नेऊन तिच्यावर जबरदस्तीने अतिप्रसंग केला. या घटनेमुळे गाव आणि परिसरात तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.गावातील अल्पवयीन पीडित मुलगी आरोपीच्या मेडिकल दुकानात गोळी आणण्यासाठी गेली होती. दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास ही मुलगी दुकानात गेल्यानंतर दुकानदार आणि दुकानातील नोकर याने काहीतरी निमित्त करून दुकानाच्या वर तिला नेले. तिच्यावर जबरदस्तीने अतिप्रसंग केला. नंतर ही बाब कोणाला सांगू नको म्हणून त्याने तिला ३० रूपयेही दिले, असे सांगण्यात येते. मात्र, ती मुलगी घरी गेल्यानंतर तिने आईला ही घटना सांगितली. तेव्हा आईने याबाबत शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्यात तात्काळ धाव घेतली. ही घटना २ नोव्हेंबर रोजी घडलेली होती.

## सत्ताधारी पक्षातील नेत्याच्या भावाचं अख्खं कुटुंब संपलं, भयंकर घटना

**पाटणा :** बिहारमध्ये विधानसभेच्या निवडणुका होत असल्याने राजकीय वातावरण ढवळून निघालं आहे. पहिल्या टप्प्याचे मतदान गुरुवारी ६ नोव्हेंबरला होत आहे, तर दुसऱ्या टप्प्याचे मतदान ११ नोव्हेंबरला होत आहे. त्यामुळे सध्या बिहारमध्ये मोठ्याप्रमाणात पोलिसांचा फौजफाटा दिसून येत आहे. मात्र, यादरम्यान एका घरात पती-पत्नी आणि मुलीचा मृतदेह सापडून आल्याने एकच खळबळ माजली आहे. हाट पोलिस स्टेशनच्या युरोपियन कॉलनी परिसरात ही घटना घडल्याची माहिती आहे. मृतांची ओळख नवीन कुशवाहा (५२), कांचन माला सिंग (४८) आणि तन्नू प्रिया अशी झाली आहे. मृत नवीन कुशवाह हे जेडीयू नेता निरंजन कुशवाह यांचे मोठे बंधू होते, त्यामुळे हे प्रकरण अधिकच चर्चेत आहेया घटनेची माहिती मिळताच सदर एसडीपीओ आणि इतर पोलीस स्टेशनचे पोलीस पूर्णिया येथील गॅलेक्सी रुग्णालयात पोहोचले आणि त्यांनी घटनेची दखल घेत तपास सुरू केला. तिघांचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले असून अहवाल आल्यानंतरच त्यांच्या मृत्यूचं खरं कारण समोर आलं आहे.या तिघांचे मृत्यू अत्यंत संशयास्पद असल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे. पतीचा मृत्यू झाल्याचं कळताच पत्नीला हार्ट अटॅक आल्याने त्यांचा मृत्यू झाला. तर, आई-वडिलांचे मृतदेह पाहून मुलीला धक्का बसला आणि ती बेशुद्ध होऊन जमिनीवर कोसळली, त्यात जखमी झाल्याने तिचाही मृत्यू झाला असावा, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. या घटनेनंतर, कुटुंबीयांनी त्यांना उपचारासाठी पूर्णिया येथील एका खाजगी रुग्णालयात नेले, जिथे डॉक्टरांनी तिघांनाही मृत घोषित केले. तथापि, स्थानिकांचे असेही म्हणणे आहे की नवीन कुशवाहाच्या मानेवर काही खुणा दिसत होत्या ज्यामुळे ही घटना संशयास्पद नसून हत्या आहे.घटनेनंतर एसडीपीओसह, हाट पोलीस स्टेशन आणि इतर पोलीस पूर्णियातील गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये पोहोचले.

# छ.संभाजीनगर नावाच्या बोर्डाखाली लघुशंका, व्हीडिओ व्हायरल होताच धमक्या; एका तरुणाचं टोकाचं पाऊल

**जालना :** छत्रपती संभाजीनगर नामफलकाच्या बोर्डाखाली लघुशंका करतानाचा दोन मित्रांचा व्हिडीओ व्हायरल झाल्याने सोशल मीडियावर खळबळ उडाली होती. या तरुणांचा व्हिडिओ इन्स्टाग्रामवर व्हायरल झाल्यानंतर त्यांना सोशल मीडियावर धमक्याही येऊ लागल्या. त्यामुळे, या तरुणांनी माफी मागतानाचा एक व्हिडिओ देखील बनवला होता. त्याच्या माध्यमातून त्यांनी माफी मागितली, पण तरीही धमक्या थांबत नसल्यानं जालन्यातील २८ वर्षीय महेश आडे या तरुणानं विहिरीत उडी घेत आपलं आयुष्य संपवल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

व्हिडिओ व्हायरल करणाऱ्या आणि धमकी देणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.नेटीझन्स आणि सोशल मीडियातून होत असलेल्या ट्रोलिंगमुळे तरुणाने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना जालना जिल्ह्यातील ढोकमळ तांडा येथे घडली. त्यानंतर, व्हिडीओ व्हायरल करणाऱ्यांवर कारवाई करा, धमकी देणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करत कुटुंबीय व नातेवाईकांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली असून आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.काही दिवसांपूर्वी दोन तरुण छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकावरील संभाजीनगर नावाच्या पिवळ्या बोर्डाखाली लघुशंका करताना आढळून आले होते.






त्यावेळी, तिथे एका तरुणाने या लघुशंका करणाऱ्या तरुणांचा व्हिडिओ काढला होता. लघुशंका करणारे हे तरुण नशेत असल्याचं सांगण्यात आलं होतं. त्यानंतर, त्यांचा हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानं त्यांनी दुसऱ्या दिवशी माफीचा एक व्हिडिओ देखील टाकला होता. त्यामध्ये, दोन्हीही तरुणांनी त्यांच्याकडून झालेल्या चुकीबद्दल माफी मागितली होती.मात्र, तरी देखील या तरुणांचे व्हिडिओज अनेक इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन व्हायरल करण्यात आले.

या घटनेमुळे मुलांना रोज धमकीचे मेसेज आणि फोन येत होते. या धमक्यांना कंटाळून २८ वर्षीय महेश आडे या तरुणाने विहिरीत उडी घेऊन जीवन संपवल्याची धक्कादायक घटना घडली. त्याआधी, 'हे सगळं मला सहन होत नाही. त्यामुळे मी आत्महत्या करेन', असं महेश आडे याने मित्रांजवळ बोलूनही दाखल होतं. त्यानंतर, विहिरीत उडी घेऊन त्याने आत्महत्या केली.

# मोदी वर्ल्ड कप विजेत्या संघाचे कौतुक करताना म्हणाले की..




**नवी दिल्ली :** भारताच्या वर्ल्ड कप विजेत्या रणरागिणींची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेट घेतली आणि एका वाक्यात सर्वांची मनं जिंकली. नरेंद्र मोदी यांची स्मरणशक्ती एवढी चांगली आहे की, त्यांना या वर्ल्ड कपमधील भारताचा प्रत्येक सामना लक्षात होता. भारतासाठी हा वर्ल्ड कप विजयाचा प्रवास सोपा नव्हता. भारताच्या संघाने कडवा संघर्ष केला आणि त्यानंतरच त्यांना हा वर्ल्ड कप जिंकता आला आहे. नरेंद्र मोदी यांनी भारतीय या संघर्षाबाबत जे एक वाक्य म्हटले, ते सर्वांनाच आवडले. कारण यापूर्वी भारताला २०१७ साली वर्ल्ड कपने हुलकावणी दिली होती. पण यावेळी नरेंद्र मोदी यांनी मात्र खेळाडूंचे कौतुक करताना खास एक शब्द वापरला आहे.

कर्णधार हरमनप्रीत कौरने २०१७ मध्ये पंतप्रधानांसोबत झालेल्या ट्रॉफीशिवाय झालेल्या भेटीची आठवण करून दिली. ती म्हणाली की, 'नरेंद्र मोदी हे आता आम्हाला ट्रॉफीसह भेटत आहेत आणि या भेटी पुढे अशाच सुरु राहाव्यात, अशी त्यांची इच्छा आहे.' उपकर्णधार स्मृती मानधना म्हणाली की, ' पंतप्रधानांनी आम्हाला प्रेरणा दिली आहे आणि आम्हा सर्वांसाठी प्रेरणास्रोत आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी त्यांच्या निवासस्थानी विश्वचषक विजेत्या भारतीय महिला क्रिकेट संघाची भेट घेतली आणि विश्वचषकात सलग तीन पराभवांचा कठीण काळ सहन केल्यानंतर खेळाडूंनी दाखवलेल्या संघाचे कौतुक केले. नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले की, ' भारतीय संघाने सलग तीन पराभवांनंतरही जी चिकाटी दाखवली, ती उल्लेखनीय होती. 'कारण भारताला दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड या तीन संघांकडून सलग पराभव पत्करावे लागले होते. पण तरीही भारतीय महिला संघाने हार मानली नाही. त्यानंतरही भारतीय महिला संघ लढत राहीली आणि अखेर त्यांनी हा वनडे वर्ल्ड कप जिंकला.भारतीय क्रिकेट संघ मंगळवारी संध्याकाळी पंतप्रधानांना भेटण्यासाठी येथे पोहोचला. रविवारी नवी मुंबईत झालेल्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव करून भारताने पहिले आयसीसी विजेतेपद जिंकले. भारतासाठी हा विजय ऐतिहासिक असाच ठरला आहे.

## रोहित शर्मा आणि कोहली यांना संघात स्थान नाही!





**दिल्ली :** गौतम गंभीर यांनी रोहित आणि विराट यांना खेळवणार असल्याचे सांगितले होते. पण रोहित आणि विराट यांना मात्र आता संघातच स्थान देण्यात आलेले नाही. या संघाचे कर्णधारपद तिलक वर्माला देण्यात आले आहे, तर इशान किशनचे या संघात दमदार कमबॅक झाले आहे.रोहित आणि विराट यांना जर भारताच्या संघात कायम स्थान टिकवायचे असेल तर त्यांनी काय करायला हवं, हे गौतम गंभीर यांनी सांगितलं होतं. रोहित आणि विराट यांना भारताच्या 'अ' संघाकडून खेळावं लागेल, कारण त्यांना चांगला सराव मिळू शकतो. त्यामुळे त्यांचा फॉर्म आणि फिटनेस हा समजला जाऊ शकतो. त्यासाठी रोहित आणि विराट यांना भारताच्या 'अ' संघात स्थान मिळवणे महत्वाचे होते. पण भारताचा संघ जाहीर करण्यात आला असून रोहित आणि विराट यांना मात्र संघाबाहेरच ठेवण्यात आल्याचे समोर आले आहे. गौतम गंभीर यांनी आपला शब्द फिरवला आहे. त्यामुळे गौतम गंभीर यांना चाहते ट्रोल करताना दिसत आहेत. पण या संघात भारताच्या एका मॅचविनरचे कमबॅक मात्र झाले आहे.भारताच्या या संघाचे नेतृत्व आता तिलक वर्माकडे सोपवण्यात आले आहे. या संघात ऋतुराज गायकवाड, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, अभिषेक शर्मा, रियान पराग, इशान किशन यांचा समावेश करण्यात आला आहे. भारतीय संघ यावेळी सामन्यांची मालिका खेळणार आहे, ही मालिका भारताच्या खेळाडूंसाठी महत्वाची ठरणार आहे. तिलक वर्माकडे भावी कर्णधार म्हणून पाहिले जात आहे, त्यामुळे त्याला यावेळी नेतृत्व देण्यात आले आहे.

## वडील सुतार.. हाताने बॅट बनवली अनब लेकीने जिंकवला वर्ल्ड कप



**नवी दिल्ली :** भारताने वर्ल्ड जिंकला तो एका कॅचमुळे. दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा भारताच्या विजयात अडसर होती. तिने शतकही झळकावले. लॉराला बाद केल्याशिवाय विजय मिळवता आला नसता. त्यावेळी अमनज्योत कौरने धावत येत तिचा अफलातून झेल पकडला आणि भारतासाठी तो विजयाचा टर्निंग पॉइंट ठरला. पण अमनज्योतचा आतापर्यंतचा प्रवास हा संघर्षपूर्ण होता. वडील सुतारकाम करायचे. वडिलांनी आपल्या हाताने लेकीसाठी बॅट बनवली आणि भारताच्या या राणीने देशाला वर्ल्ड कप जिंकून दिला. पण अमनज्योतला हे यश सहजासहजी मिळालेलं नाही.मोहालीमध्ये अमनज्योत कौरचे वडील, भूपिंदर सिंग, जे मोहालीमध्ये सुतार काम करायचे. अम नज्योत रस्त्यांवर क्रिकेट खेळायची. तिचं क्रिकेट एवढं दमदार होतं की, लोकं तिच्या खेळाच्या प्रेमात पडले. लोकं तिच्या घरी यायचे. वडिलांना सांगायचे तिला क्रिकेटर बनवा. वडिलांनाही गंभीरपणे ही गोष्ट घेतली. मुलीसाठी त्यांनी प्रशिक्षक शोधायला सुरुवात केली. पण त्यांना चांगला प्रशिक्षक मिळत नव्हता, अखेर त्यांची गाठ नागेश गुप्ता यांच्याशी झाली आणि तिचं नशिब बदललं. चंदीगढमध्ये तिचा रोजचा सराव सुरु झाला. बीसीसीआयच्या स्पर्धा ती खेळायला लागली आणि ती नावारुपाला आली. २०२१ आणि २०२२ या दोन वर्षांत तिने धावांचे डोंगर उभारले आणि भारतीय संघाचा दरवाजा तिच्यासाठी खुला झाला.आपल्या पहिल्या सामन्यातच तिने संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. वर्ल्ड कपमध्ये तर प्रत्येक सामन्यात तिची चम कदार कामगिरी झाली. २५ वर्षीय अम नज्योतने आपल्या खेळाने सर्वांना प्रभावित केले. तिने ऑस्ट्रेलियाशी शतकवीर पी. लिचफिल्डला बाद केलं. ती एवढ्यावरच थांबली नाही तर भारताला विजयासाठी आठ धावांची गरज होती, तेव्हा ती अजिबात घाबरली नाही. पहिल्या चेंडूवर तिने चौकार मारला, दुसऱ्या चेंडूवर तिने दोन धावा घेतल्या आणि तिसऱ्या चेंडूवर पुन्हा चौकार मारून भारताला विजय मि ळवून दिला. या विजयामुळेच भारताला वर्ल्ड कपचा मार्ग खुला झाला. पण या यशानंतर अमज्योतच्या वडीलांची मेहनत सर्वांसमोर आली. मुलीला क्रिकेटपटू बनण्यासाठी त्यांनी झोकून दिले. अपार कष्ट घेतले, पण अमनज्योतला काही कमी पडू दिले नाही.

## खेळाडूंवर कारवाई पण नक्वींवर कधी?



**पुणे :** भारताने आशिया कप जिंकला, पण त्यांना ट्रॉफी मिळू शकली नाही. पाकिस्तानच्या क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांच्यामुळे. आशिया कपमधील दोषी खेळाडूंवर आयसीसीने कारवाई केली, पण सोमहिसन नक्वी यांच्यावर कारवाई कधी होणार, हा प्रश्न सर्वांनाच पडला होता. पण आता आयसीसीच्या बैठकीत याबाबतची चर्चा नेमकी कधी होणार आहे, हे आता समोर आले आहे. यावेळी आयसीसीचे अध्यक्ष जय शहा हे मोहसिन नक्वी यांच्यावर काय कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.भारतीय क्रिकेट संघास आशिया कप टी-२० क्रिकेट स्पर्धेतील विजेतेपदाचा करंडक अद्याप न दिल्याबाबतची चर्चा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या(आयसीसी) शुक्रवारी होणाऱ्या बैठकीत होणार आहे. कारण या विषयाचा आयसीसीच्या विषय पत्रिकेतच समावेश होणार असल्याचेही सूत्रांनी सांगितले.आयसीसीच्या कार्यकारिणीची शुक्रवारी बैठक आहे. त्या वेळी सर्व क्रिकेट बोर्डाचे प्रमुख उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्याच दिवशी भारतास आशिया कप विजेतेपदाचा करंडक अद्याप न दिल्याबद्दल चर्चा होण्याची शक्यता आहे. बीसीसीआयने यासाठी आग्रह धरला आहे. याचा त्यादिवसाच्या विषय पत्रिकेतही समावेश होऊ शकतो, असे सूत्रांनी सांगितले.भारतीय क्रिकेट संघाने २८ सप्टेंबरला झालेल्या आशिया कप टी-२० स्पर्धेच्या अंतिम लढतीत पाकिस्तानला हरवले होते. त्या वेळी भारतीय संघाने आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांच्याकडून विजेतेपदाचा करंडक स्वीकारण्यास नकार दिला. नक्वी हे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष; तसेच पाकमधील अंतर्गत सुरक्षामंत्रीही आहेत. नक्वी यांनी त्यानंतर करंडक दुबई येथील आशियाई क्रिकेट परिषदेच्या मुख्यालयात नेला. एवढेच नव्हे तर सातत्याने भारतीयांना माझ्याकडूनच करंडक स्वीकारावा लागेल, अशी भूमिका घेतली आहे.

***

## द.आफ्रिकेच्या सामन्यांसाठी भारताचा संघ जाहीर

**नवी दिल्ली :** दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी भारताचा संघ नुकताच जाहीर करण्यात आला आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात दोन कसोटी सामन्यांची मालिका होणार आहे, या मालिकेसाठी हा संघ घोषित करण्यात आला आहे. या संघाचे वैशिष्ट म्हणजे मॅचविनर खेळाडूचे संघात दमदार कमबॅक झाले आहे. त्यामुळे आता शुभमन गिलची चिंता मिटलेली असेल.

भारताचा टी २० संघ सध्या ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर आहे. कारण भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात दोन टी २० सामने अजून बाकी आहेत. हे दोन सामने झाले की भारतीय संघ मायदेशी परतणार आहे आणि त्यानंतर त्यांची दक्षिण आफ्रिकेच्या संघाबरोबर कसोटी मालिका होणार आहे. ही मालिका भारतासाठी महत्वाची असणार आहे. कारण या मालिकेत भारताने विजय मिळवला तर त्यांना थढउ ऋछपरश्र च्या पॉइंट्स टेबलमध्ये मानाचे स्थान पटकावता येऊ शकते. त्यामुळे भारताच्या संघाची निवड करताना यावेळी दमदार खेळाडूंनाच संधी दिली आहे.रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्याविना भारताचा संघ हा शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली खडतर समजल्या जाणाऱ्या इंग्लंडच्या दौऱ्यावर गेला होता.

भारताने शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली इंग्लंडला त्यांच्याच मातीत पाणी पाजलं होतं. भारताने अखेरचा सामना जिंकला आणि मालिकेत बरोबरी साधली होती. त्यानंतर आता भारताचा संघ कसोटी मालिकेत दक्षिण आफ्रिकेशी दोन हात करणार आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शेतकऱ्यांच्या लेकींच्या मदतीसाठी दिग्दर्शक प्रवीण तरडे सरसावले; शिक्षणासाठी ११ लाखांची मदत

**मुंबई :** दिग्दर्शक प्रवीण तरडे यांनी मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या लेकींसाठी मोठी मदत केलीय. चित्रपटाचं शूटिंग थांबवून त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी ११ लाखांची मदत केली आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक प्रवीण तरडे यांनी देऊळबंद २ चित्रपटाच्या टीमसह शिर्डीत साई समाधीचे दर्शन घेतले. 'देऊळबंद २' या आगामी चित्रपटाचं शूटिंग थांबवून प्रवीण तरडे आणि त्यांच्या टीमनं शेतकऱ्यांना आर्थिक मदत केली. मराठवाड्यातील आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलींच्या शिक्षणासाठी तब्बल ११ लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.



मराठवाड्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या लेकींसाठी प्रवीण तरडे यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत करत त्यांनी असलेल्या समाजाविषयीची आपुलकी दाखवलीय. शिर्डीत साईबाबांचं दर्शन घेतल्यानंतर प्रवीण तरडे यांनी माध्यमांशी संवाद साधला.. यावेळी मराठवाड्यातील आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलींच्या शिक्षणासाठी ११ लाख रुपयांची मदत जाहीर केली.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या कुठल्याच मुलीचं शिक्षण बंद पडू देणार नाही. चित्रपटाचं शूटिंगनंतर करू, पण आधी मुलींना शिक्षणासाठी मदत करणार आहोत. शेती विकायची नसते, शेती राखायची असते. आम्ही करत असलेली मदत थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल अशी प्रतिक्रिया तरडे यांनी दिली आहे. 'देऊळ बंद २' चित्रपट ५ डिसेंबरला रिलीज होणार होता. मात्र त्यांनी आता चित्रपटाचे शूटिंग थांबवलंय. चित्रपटाचे शूटिंग थांबून सगळे कलाकार शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मैदानात उतरलेत. 'देऊळ बंद २'च्या टीमकडून ११ लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. पुणे पत्रकार संघ आणि शिवार हेल्पलाइनच्या मदतीने पूरग्रस्त भागात गरजू लोकांपर्यंत आणि विद्यार्थ्यांपर्यंत ही मदत पोहचवली जाणार आहे. देऊळ बंद सिनेमाच्या पहिल्या भागात अभिनेता गष्मीर महाजनी, मोहन जोशी, निवेदिता सराफ हे कलाकार होते. यामध्ये गष्मीर महाजनी हा वैज्ञानिक होता, जो स्वामींचं मंदिर बंद करतो. मोहन जोशी यांनी या सिनेमात स्वामींची भूमिका साकारली होती. देऊळ बंद २ मध्येही जास्त भीषण वास्तव असेन. मागच्या भागात देवाला वैज्ञानिक भेटला होता. आता या भागात स्वामींना शेतकरी भेटणार असं प्रवीण तरडे देऊळ बंद २ ची घोषणा करताना म्हणाले होते.

## आली मोठी शहाणीच्या गोव्यातील चित्रीकरणाचा श्रीगणेशा !



**मुंबई :** काही दिवसांपूर्वी घोषित झालेल्या 'आली मोठी शहाणी' या चित्रपटाने प्रेक्षकांची उत्सुकता चांगलीच वाढवली आहे. आता या चित्रपटाच्या गोव्यातील चित्रीकरणाचा श्रीगणेशा झाला असून, या निमित्ताने प्रेक्षकांसमोर एक नवी आणि हटके जोडी झळकणार आहे ती म्हणजे हृता दुर्गुळे आणि सारंग साठ्येची! या दोघांची फ्रेश ऑनस्क्रीन केमिस्ट्री नेमकी कशी असणार, हे पाहाण्यासाठी प्रेक्षक आतुर आहेत. हृता तिच्या गोड आणि प्रभावी अभिनयासाठी ओळखली जाते, तर सारंगने नेहमीच वेगळ्या भूमिकांद्वारे प्रेक्षकांवर ठसा उमटवला आहे. त्यामुळे 'आली मोठी शहाणी'त दोघांची जोडी नेमकी कोणत्या कथानकातून झळकणार, याबद्दलची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

चित्रपटाचं शीर्षक 'आली मोठी शहाणी' जितकं आकर्षक, तितकंच ते कथानकाबद्दल कुतूहल निर्माण करणारं आहे. आता या हटके शीर्षकाखाली नेमकं काय घडणार आणि हृता-सारंगची जोडी प्रेक्षकांच्या मनात किती शहाणी ठरणार, हे पाहाणं उत्सुकतेचं ठरणार आहे! दरम्यान, या चित्रपटाचं लेखन व दिग्दर्शन आनंद दिलीप गोखले यांनी केलं आहे. 'फाईन ब्रू प्रॉडक्शन्स' प्रस्तुत आणि 'ड्रू होप फिल्म वर्क्स'च्या सहयोगाने प्रेक्षकांच्या भेटीला येणाऱ्या या चित्रपटाचे निर्माते जयकुमार मुनोत, ईशा मूठे आणि श्रुती साठे आहेत.

## अक्षय कुमारची भाची सिमर बॉलिवूडमध्ये

**मुंबई :** अक्षय कुमार दशकांपासून चित्रपटसृष्टीत स्वत:चे स्थान निर्माण करून आहे. त्याच्या मुलांनी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवले नसले तरीही त्याची भाची सिमर भाटिया आता बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. दिनेश विजान यांच्याकडून निर्मित 'इक्कीस' चित्रपटातून सिमर भाटिया बॉलिवूडमध्ये पाऊल ठेवणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला असून यात सिमरची किंचित झलक पाहून चाहते उत्सुक झाले आहेत. तर आता अक्षयने भाचीच्या पदार्पणावरून आनंद व्यक्त केला आहे. माझी चिमुकली सिमी आता लहान राहिलेली नाही. लिव्हिंग रुममधील तिच्या परफॉर्मन्सपासून 'इक्कीस'मध्ये बिग स्क्रीनपर्यंत तिच्या उपस्थितीमुळे मन भरून आले आहे. चित्रपटात अगस्त्य नंदाचा वावरही भन्नाट आहे. चित्रपटाच्या पूर्ण टीमला शुभेच्छा, असे अक्षयने स्वत:च्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

'इक्कीस' चित्रपटात सिमर भाटिया, अगस्त्य नंदाची प्रेमिका म्हणून भूमिका साकारणार आहे. चित्रपटात लेफ्टनंट अरुण खेत्रपाल यांची व्यक्तिरेखा अगस्त्य साकारत आहे. खेत्रपाल हे १९७१ च्या युद्धात वयाच्या केवळ २१ व्या वर्षी हुतात्मा झाले होते. चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला असून यातील अगस्त्यच्या अभिनयाचे कौतुक होत आहे. या चित्रपटाचे दिग्दशन श्रीराम राघवन यांनी केले आहे. हा चित्रपट डिसेंबर महिन्यात प्रदर्शित होणार आहे.

***



## हंसिका मोटवानीने आडनावात केला बदल



**मुंबई :** दाक्षिणात्य आणि हिंदी चित्रपटांमधील अभिनेत्री हंसिका मोटवानीने स्वत:च्या आडनावाच्या स्पेलिंगमध्ये किरकोळ बदल केला आहे. परंतु चाहत्यांचे लक्ष तिच्या या कृतीने वेधून घेतले आहे. हा बदल हंसिकाने उद्योजक पती सोहेल कथूरियासोबत घटस्फोट घेणार असल्याच्या चर्चेदरम्यान करण्यात आला आहे. तिने हा बदल वैयक्तिक कारणाने केला आहे का, एखाद्या ज्योतिषाच्या सल्ल्यातून केला आहे हे मात्र स्पष्ट झालेले नाही. हंसिकाने स्वत:च्या आडनावाचे स्पेलिंग अधिकृत स्वरुपात अपडेट केले आहे. अंक ज्योतिषासाठी नावात बदल करणे कलाकारांदरम्यान सामान्य प्रकार असतो. हंसिकाचे आयुष्य सध्या अनेक घटनांमुळे प्रसारमाध्यमांमध्ये चर्चेत आहे. अशा स्थितीत तिने आडनावाच्या स्पेलिंगमध्ये बदल केल्याने उलटसुलट चर्चा सुरू आहे. हंसिकाने बालकलाकार म्हणून काम करण्यास सुरुवात केली होती. ती 'शाका लाका बूम बूम' टीव्ही शोनंतर ऋतिक रोशनचा चित्रपट 'कोई मिल गया'मध्ये दिसून आली होती. मग २००७ साली तिने अल्लू अर्जुनसोबत 'देसामुदुरु' चित्रपटात काम केले होते. तमिळ आणि तेलगू चित्रपटसृष्टीतील ती प्रसिद्ध अभिनेत्री आहे.

## माधवन दिसणार एका बायोपिकमध्ये

**मुंबई :** अभिनेता माधवन सध्या स्वत:चा आगामी चित्रपट 'जीडीएन'वरून चर्चेत आहे. हा चित्रपट प्रत्यक्षात 'भारताचे एडिसन' जी.डी. नायडू यांचा बायोपिक आहे. याचा फर्स्ट लुक अलिकडेच समोर आला आहे. चित्रपटाच्या टीझरमध्ये माधवनने पुन्हा एकदा स्वत:च्या ट्रान्सफॉर्मेशनने चकित केले आहे. आर. माधवनने चित्रपटाचा टीझर शेअर करत 'जी. डी. नायडू यांचे स्पिरिट आता अधिकृतपणे समोर आले आहे, ही एक अशी कहाणी आहे, ज्यात बेजोड व्हिजन, मोठी एम्बिशन आणि पक्का निर्धार आहे' असे कॅप्शनदाखल नमूद केले आहे. चित्रपटातील माधवनचा लुक पाहून चाहते चकित झाले आहेत. 'जीडीएन' चित्रपटात आर. माधवनसोबत प्रियामणि, जयराम आणि योगी बाबू यासारखे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन कृष्णकुमार रामकुमार करत आहेत. वर्गीस मूलन पिक्चर्सने या चित्रपटाची निर्मिती केली आहे. हा चित्रपट पुढील वर्षी प्रदर्शित होणार आहे. माधवन याचबरोबर अजय देवगण आणि रकुल प्रीत सिंहसोबत 'दे दे प्यार दे २'मध्ये दिसून येणार आहे. हा चित्रपट १४ नोव्हेंबरला प्रदर्शित होणार आहे.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# चिखली नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची पूर्व तयारी व इच्छुक उमेदवार यांची बैठक

**जनसंचलन/बुलडाणा**

चिखली येथे बालाजी अर्बन पतसंस्थेच्या सभागृह येथे दि. ३ नोव्हेंबर २०२५ रोजी भारतीय जनता पक्षाची चिखली नगर परिषद पूर्व तयारी व इच्छुक उमेदवार यांची मुलाखत बैठक भाजपचे माजी राज्यमंत्री मा.रणजीतजी पाटील व जिल्हाध्यक्ष माजी आमदार विजयराज शिंदे यांच्या पर्यवेक्षणात उत्स्फूर्त सहभागाने पार पडली. या बैठकीस उपस्थित राहून भाजपा पक्ष पूर्ण क्षमतेने निवडणूक लढवणार असून चिखली नगर परिषदेवर भाजपाचाच झेंडा फडकवीसाठी कार्यकर्त्यांनी व इच्छुक उमेदवार यांनी कामाला लागण्याच्या सूचना दिल्या आहे. या वेळी बैठकीस चिखलीच्या आमदार सौ श्वेताताई महाले पाटील ,मान्यवर भाजपा जिल्हा सरचिटणीस पंजाबराव धनवे, शहराध्यक्ष सागर पुरोहित यांसह



भाजपा पदाधिकारी व इच्छुक उमेदवार यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मलकापूर येथे राष्ट्र गौरव पुरस्कार वितरण समारंभ संपन्न...




**जनसंचलन/मलकापूर**

डिजिटल प्रेस क्लब ऑफ इंडिया च्या वतीने आयोजित राष्ट्र गौरव पुरस्कार २०२५ कार्यक्रम मलकापूर येथील भातृ मंडळ येथे आयोजित करण्यात आला सदर कार्यक्रमात महाराष्ट्राचे कानाकोपऱ्यातील आलेल्या विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा सत्कार करण्यात आला आंतरराष्ट्रीय मानांकन आयएसओ ९००१२०१५ प्रमाणित प्रेस क्लब ऑफ इंडिया च्या वतीने विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्याच्या उद्देशाने व त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्र गौरव पुरस्कार २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रस्ताव ऑनलाइन मागवण्यात आले होते त्यावेळी ७६८ प्रस्तावांपैकी निवड करून १५६ मान्यवरांना राष्ट्र गौरव पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला. तसेच शिक्षण क्षेत्रात बहुमूल्य कार्य करणाऱ्या ११८ शिक्षकांचा सुद्धा नॅशनल आयकॉन अवॉर्ड देऊन गौरव करण्यात आला.

# कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मासिक सभेत मनमर्जी ठराव!

**जनसंचलन/बुलढाणा**

स्थानिक कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मासिक सभेत इतिवृत्त वेळेवर न लिहिता नंतर लिहील्या जाते, त्यामुळे मागील ठरावाला विरोध असून, बाजार सामितीच्या ठराव पुस्तीकेवर विरोधात्मक नोंद व्हावी, अशी मागणी संबधितांना करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले की, मागील मासिक सभेमध्ये पारित झालेल्या ठरावास तीव्र विरोध आहे. हा विरोध बाजार समितीच्या ठराव पुस्तिकेवर तातडीने नोंदविण्यात यावा,कारण सदर ठरावामध्ये मांडलेले काही महत्वाचे मुद्दे हे सभेच्या अधिकृत विषयसूचीमध्ये समाविष्ट नव्हते, परंतु ते ऐनवेळी अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेसाठी घेण्यात आले.बाजार समितीच्या हिताला बाधा हे ऐनवेळी घेतलेले मुद्दे आणि त्यावर झालेला ठराव हे बाजार समितीच्या दीर्घकालीन हिताचे नाहीत, अशी आमची स्पष्ट भूमिका आहे.सभेत विरोध नोंदवूनही दुर्लक्ष करण्यात आले. सदर ठरावावर मासिक सभेत चर्चा सुरु असतानाच विरोध स्पष्टपणे दर्शविला होता, परंतु त्याची अधिकृत नोंदणी झालेली नाही. इतिवृत्ताबाबतची समस्या कायम आहे. सध्या मासिक सभेचे इतिवृत्त सभेच्या समाप्तीनंतर उशीरा लिहिले जाते आणि ते पुढील मासिक सभेत मंजुरीसाठी ठेवले जाते. या विलंबामुळे, सभेमध्ये नोंदविलेला विरोध इतिवृत्तात समाविष्ट केला जात नाही, परिणामी विरोध अधिकृतपणे दुर्लक्षित होतो. याची गांभीर्याने नोंद घ्यावी, अशी मागणी ॲड. सुनिल देशमुख, देविदास जाधव, कल्याणराव जाधव यांनी संबंधितांना निवेदन देऊन केली आहे.

## भाईगिरी वाढली,पण कानून के हाथ लंबे!

# देशी कट्टे,जिवंत काडतूस जप्त!

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात एवढी भाईगिरी वाढली की,थेट जिवंत काडतूसह देशी कट्टे बुलढाण्यात पोहोचत आहे. परंतु पोलीस दल काही कमी नाही, कानून के हाथ लंबे होते त्यामुळे तामगाव पोलीस स्टेशन हद्दीत आरोपी पवन वासुदेव कोकाटे (वय ३४) रा. नांदेड याला वरवट बकाल येथे जेरबंद करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अमोल गायकवाड अपर अधीक्षक , श्रेणिक लोढा अप्पर पोलीस अधीक्षक खामगांव यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक सुनिल अंबुलकर यांचे आदेशाने ४ नोव्हेंबर रोजी पोलीस स्टेशन तामगाव हद्दीत कलम ३, २५, आर्म ॲक्ट प्रमाणे कारवाई करण्यात आली. तामगाव



पोलीस ठाण्यात . कलम ३,२५ . भाहका सहकलम १२३,१३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपी पवन वासुदेव कोकाटे याने देशी बनावटीचे दोन कट्टे व चार जिवंत काडतुस बाळगल्याने त्याच्याकडून एकूण ८४००० हजारांचा माल जप्त केला आहे. ही कारवाई पंकज सपकाळे, एजाज खान,अमोल अजीस परसुवाले, शिवानंद हेलगे यांनी केली आहे

# जिल्ह्यातील तीन सिओंच्या बदल्या !


## बुलढाण्यात जयश्री काटकर!

**जनसंचलन/बुलढाणा**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील तीन मुख्याधिकाऱ्यांची बदली झाली आहे. विशेष म्हणजे बुलढाण्यातील नगरपालिकेचे मुख्याधिकारी गणेश पांडे हे शेगाव तर शेगाव येथील जयश्री काटकर बुलढाणा मुख्याधिकारी पदी रुजू होणार आहेत.देऊळगाव राजा येथील अरुण मोकळ यांची बदली ढाणकी नगरपंचायत जि. यवतमाळ येथे झाली आहे. राज्यातील नागरी स्थानिक संस्थांच्या आगामी सार्वत्रिक निवडणुका मुक्त व नि:पक्षपातीने पार पाडण्यासाठी व निवडणूक प्रक्रिया पारदर्शी व्हावी, यासाठी अधिकारी व कर्मचारी यांच्याद्वारे हा निवडणूक कार्यक्रम हाताळण्याच्या दृष्टीने व प्रतिबंधात्मक आणि इतर उपाय योजनेच्या दृष्टिकोनातून राज्य निवडणूक आयोगाने तात्पुरत्या स्वरूपात प्रशासकीय सेवेतील




अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत. यामध्ये बुलढाण्यातील नगरपालिकेचे सीओ गणेश पांडे यांची शेगाव नगरपालिकेत मुख्याधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली.तर शेगाव येथील जयश्री काटकर आता बुलढाण्याच्या मुख्याधिकारी राहणार आहेत. देऊळगाव राजा येथील अरुण मोकळ हे यवतमाळ जिल्ह्यातील ढाणकी नगरपंचायतचे मुख्याधिकारी राहणार आहेत.

# समृद्धी महामार्गावर खड्ड्यांची संख्या वाढली वाहने अनियंत्रित; अपघाताची संख्या वाढली!

**जनसंचलन/दुसरबीड**

समृद्धी महामार्ग सध्या खड्ड्यांच्या तावडीत सापडल्याचे चित्र दिसत आहे. महामार्गावरील काँक्रिट रस्त्यावर जागोजागी खोल खड्डे पडले असून, या खड्यांमुळे वेगात येणारी वाहनांचा अपघात होत आहे. अनेक घटनांमध्ये वाहनचालकांचा वाहनावरील ताबा सुटल्याने अपघात होत असल्याची प्रवाशांतून ओरड आहे. महामार्गावरील खड्डे बुजविण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात डांबराचा वापर केला जातो; मात्र, सिमेंटच्या रस्त्यावर हे डांबर टिकत नाही. वेगवान वाहनांच्या दाबाखाली काही तासांतच ते निघून जाते आणि पुन्हा रस्त्यावर खोल खड्डे निर्माण होतात. त्यातून समस्या निर्माण होत आहे. नागपूर कॉरिडॉरवरील चॅनल क्रमांक ३१९.३ (टोलनाक्याजवळ, तढेगाव परिसर) येथे पडलेल्या खड्डयांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले असतानाही दुरुस्तीची कोणतीही प्रभावी उपाययोजना करण्यात आलेली नाही. या खड्ड्यांमुळे अनेकदा वाहन घसरून बाजूच्या रेलिंगला किंवा पुलाच्या कडेला आदळतात. तरीसुद्धा रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी केवळ नामधारी काम करत असल्याची ओरड आहे. गेल्या काही महिन्यांत महामार्गावर दिवसांपासून समृद्धीवर अपघाताची मालिका सुरूचा पुलावरील स्लॅब कोसळणे, रस्त्याचे भाग उखडणे आणि खड्यांमुळे अपघात होणे हे प्रकार सातत्याने घडत आहेत. त्यामुळे या महामार्गावरील प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा अधोरेखित झाला आहे. तळेगावजवळील पुलाजवळच्या खड्यांची स्थिती अत्यंत गंभीर याठिकाणी असून, तातडीने दुरुस्ती न झाल्यास आणखी मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा इशारा स्थानिक प्रवाशांनी दिला आहे. त्यामुळे एमएसआरडीसीने या मार्गावरील खड्डे त्वरेने बुजवण्याची मागणी होत आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या जिल्हाध्यक्षपदी प्रसेनजित पाटील

**जनसंचलन/ जळगाव जामोद**



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी बाजार समितीचे सभापती तथा पणन महासंघाचे उपाध्यक्ष प्रसेनजित पाटील यांची ५ नोव्हेंबर रोजी नियुक्ती करण्यात आली. मुंबई येथील राष्ट्रवादीच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या या नियुक्तीप्रसंगी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार ॲड. शशिकांत शिंदे यांनी पाटील यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. यावेळी राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेत्या आ. विद्या चव्हाण, रोहिणी खडसे, रवींद्र पवार यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. प्रसेनजित पाटील यांच्या नियुक्तीची माहिती समजताच जळगाव जामोद येथील तहसील चौकात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला. यावेळी विधानसभा अध्यक्ष विश्वासराव भालेराव, इरफान खान, विठ्ठल वाघ, महादेव भालतडक, सिद्धार्थ हेलोडे, सुभाष कोकाटे, मनोहर वाघ, शेख जावेद, संजय ढगे, सुभाष पाटील, ॲड. करीम खान, ॲड. मोहसीन खान यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# माहेरी गेलेल्या पत्नीला मारहाण करून दिला तोंडी तलाक

**जनसंचलन/बुलढाणा**

पतीच्या सततच्या त्रासाला कंटाळून धाड येथील माहेरी गेलेल्या सलमा परवीन मोहम्मद शहानवाज (वय ३०, रा. जमजमनगर, बोरखेड) यांना त्यांच्या पतीने शिवीगाळ करून मारहाण केली, तसेच तोंडी तलाक दिला. याप्रकरणी बुलढाणा ग्रामीण पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनूसार पोलिसांनी तत्काळ कारवाई करत मुस्लीम महिला कायदा, २०१९ कलम ४ अंतर्गत संबंधीत पतीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. फिर्यादीनुसार, ४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजेच्या समारास पती मुस्लीम महिला कायद्यानुसार पतीविरुद्ध गुन्हा! मोहम्मद शहानवाज (वय ३५, रा. इंदिरानगर, बुलढाणा) हा धाड येथे आला. काही कारणाशिवाय त्याने सलमा यांना शिवीगाळ केली, तसेच तीन वेळा तलाक म्हणत लग्न संपल्याचे सांगितले. सासऱ्याला ही मारहाण केली. याशिवाय, सलमा यांना मारहाण करून फाशी घेऊन सर्वांना फसविण्याची धमकी दिल्याचे त्यांनी नमूद केले. पोलिसांनी घटनेची गंभीर दखल घेत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. घटनास्थळी उपस्थित साक्षीदारांचेदेखील जबाब घेतले जात आहेत




# महायुतीच्या विजयासाठी एकजुटीने काम करा-खासदार श्रीकांत शिंदे

## मेहकरात शिवसंकल्प प्रशिक्षण शिबिर उत्साहात

**जनसंचलन/मेहकर**



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांच्या विजयासाठी प्रत्येक शिवसैनिकाने जीवाचे रान करावे, असे आवाहन शिंदेसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी केले. मेहकर येथे आयोजित शिंदेसेनेच्या बुलढाणा जिल्हा शिवसंकल्प पदाधिकारी प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते आणि माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या उपस्थितीत पार पडले. सायंकाळच्या समारोप सत्रात खासदार श्रीकांत शिंदे पुढे म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्था या कार्यकर्त्यांच्या थेट संपर्कातील निवडणुका आहेत. त्यामुळे प्रत्येकाने जबाबदारीने काम करत मेहकरमध्ये शिंदेसेनेचे शिवसंकल्प प्रशिक्षण शिबिरास उपस्थित मान्यवर महायुतीला विजय मिळवून द्यावा. सरकारने सर्वसामान्यांसाठी राबविलेल्या योजनांची माहिती घराघरात पोहोचविणे हीच खरी निवडणूक तयारी असल्याचे ते म्हणाले. यावेळी आमदार अर्जुन खोतकर, आमदार संजय गायकवाड, तसेच माजी आमदार संजय रायमुलकर यांनीही विचार व्यक्त केले. महिलांचा राजकारणातील सहभाग या विषयावर आमदार मनीषा कायंदे आणि प्रवक्त्या डॉ. ज्योती वाघमारे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. आ. कायंदे म्हणाल्या, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना हीच खरी शिवसेना आहे. लाडकी बहीण, लखपती दीदी, विद्यार्थिनींसाठी मोफत शिक्षण, एस.टी. प्रवास सवलत अशा योजनांद्वारे महिलांच्या सक्षमीकरणाचा नवा अध्याय लिहिला जात आहे. डॉ. वाघमारे यांनी सांगितले की, प्रत्येक सरकारी कागदपत्रावर आईचे नाव वडिलांच्या आधी नोंदविण्याचा ऐतिहासिक निर्णय एकनाथ शिंदे यांनी घेतला. शिबिराच्या उत्तरार्धात विश्वनाथ केळकर यांनी लक्षवेध ॲपविषयी माहिती दिली, तर प्रतिक शर्मा यांनी राजकारणातील सोशल मीडियाचा प्रभाव या विषयावर सादरीकरण केले. जिल्हाभरातून तब्बल अडीच हजारांहून अधिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी या शिबिरात सहभाग घेतला

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८